# विभाग ४(१)(बी)(iv)

## धोरण तयार करण्याकरिता व धोरणाच्या अमंलबजावणीकरिता जनतेच्या सल्ल्याने अथवा निवेदनाव्दारे अस्तित्वात आलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील.

महानगरपालिका प्रशासनाच्या विकास नियोजन विभागाकडे मुंबई शहराच्या उपविभागातील नियोजनाचे प्रस्ताव तसेच सार्वजनिक उद्दिष्टांकरिता जमिनी संपादन करण्याच्या प्रस्तांवाचे काम सोपविले आहे. विकास नियोजन खात्याशी संबंधित तयार केलेल्या धोरणांचे जनहितावर दीर्घकालीन परिणाम होतात म्हणून खात्याचे सतत असे प्रयत्न असतात की अशा धोरणांचा सकारात्मक / अनुकूल परिणाम होईल. अर्थातच विकास आराखडयात बदल करण्याकरिता सार्वजनिक सहभाग आवश्यक आहे हे सांगण्याची गरज नाही.

मुंबई प्रारुप विकास आराखडा सन २०१६ मध्ये तयार केला गेला आणि जनतेकरिता, त्यांचे मत व्यक्त करण्याकरिता पाहणीसाठी ठेवला होता. नियोजन प्राधिकरणाने तसेच राज्यशासनाने जनतेकडून सूचना आणि / अथवा हरकती मागविल्या होत्या. वैयक्तिक सुनावणी करुन त्यानंतर विकास आराखडयास अंतिम स्वरुप दिले गेले. विविध विभागांचा पुनर्रचित विकास आराखडा सन २०१८ मध्ये कार्यान्वित झाला.

शहराचा विकास ही एक गतिशील प्रक्रिया आहे आणि बदलत्या परिस्थितीत नाविन्यपूर्ण नियोजन संकल्पना तसेच सामाजिक, सांस्कृतिक, वाणिज्य, वैज्ञानिक, शैक्षणिक संकल्पना व नागरिकांच्या मनोरजंन गरजा अंतर्भूत करण्याकरिता विकास आराखडा प्रस्तावांमध्ये बदल करणे आवश्यक असते.

५.१ <u>धोरण तयार करण्याकरिता जनतेचा अथवा जनतेच्या प्रतिनिधींचा सहभाग.</u>

| अनु.क्र. | विषय | जनतेचा सहभाग असणे अनिवार्य आहे का ? | सार्वजनिक सहभागाकरिता व्यवस्था |
|---|---|---|---|
| १. | विकास आराखडयात फेरबदल | होय | शहरातील नागरीक, अशासकीय संस्था व सामाजिक कार्य करणारे गट, आकांक्षा पूर्ण करण्याकरिता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 च्या कलम 37 चा अवलंब करुन विकास आराखडयात फेरबदल करण्याची कार्यवाही केली जाते. प्रस्तावित फेरबदलासंबंधी सूचना / हरकती मागविणारी सूचना किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात व शासकीय राजपत्रात प्रकाशित केली जाते. या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सूचनेत प्रस्तावित फेरबदलासंबंधी तपशील दिला जातो. विकास नियोजन खात्यातील अधिका-यांकडून ज्यानीं मत दाखल केले आहे अशा सर्व व्यक्तींची सुनावणी केली जाते . फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम मंजूरी देतेवेळी नियोजन प्राधिकरण तसेच राज्य शासन अशा सूचना / हरकतींचा विचार करतात. |
| २. | नगररचना योजनेतील फेरबदल | होय | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 91 व 92 मधील तरतुदीनुसार, मंजूर नगररचना योजनामध्ये फेरबदल केले जातात. सूचना / हरकती मागविणारी सूचना किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात व तसेच शासकीय राजपत्रात प्रकाशित केली जाते ज्यामध्ये प्रस्तावित फेरबदलाचे तपशील दिला जातो. फेरबदलासंबंधी ज्यांनी मत व्यक्त केले आहे अशा सर्व व्यक्तींची सुनावणी, विकास नियोजन खात्यातील अधिका-यांकडून केली जाते. फेरबदल प्रस्तावास अंतिम मंजुरी देतेवेळी, नियोजन प्राधिकरण तसेच राज्यशासन अशा सूचना / हरकतीचां विचार करतात. |
| ३. | विकास नियंत्रण आणि प्रोत्साहक नियमावली २०३४ मध्ये फेरबदल | होय | शहरातील नागरिक, अशासकीय संस्था व सामाजिक कार्य करणारे गट यांच्या आकांक्षा पूर्ण करण्याकरिता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37 चा अवलंब करुन विकास नियंत्रण नियमावली २०३४ आणि प्रोत्साहन मध्ये फेरबदल करण्याची कार्यवाही केली जाते. प्रस्तावित फेरबदलाचा तपशील देणारी सूचना किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात व शासकीय राजपत्रात प्रकाशित केली जाते ज्या व्दारे जनतेकडून फेरबदलावर सूचना / हरकती मागविल्या जातात. ज्या व्यक्तिंनी त्यांचे मत नमूद केले आहे अशा सर्व व्यक्तिंना वि.नि. खाते सुनावणी देते. फेरबदल प्रस्तावास अंतिम मंजुरी देते वेळी नियोजन प्राधिकरण तसेच राज्यशासन प्राप्त सूचना /हरकतींचा विचार करतात. |

## ५.२ धोरणांची अंमलबजावणी करण्यामध्ये जनतेचा अथवा जनतेच्या प्रतिनिधींचा सहभाग

| अनु. क्र. | विषय | जनतेचा सहभाग असणे अनिवार्य आहे का ? | सार्वजनिक सहभागाकरिता व्यवस्था |
|---|---|---|---|
| अ. | आर्थिक नुकसान भरपाई करुन जमीन संपादन करणे. | होय, अशा प्रस्तावांमध्ये सुधार समिती व महानगरपालिकेची मंजूरी घेतली जाते. | निवडून आलेल्या प्रतिनिधीचा समावेश असलेल्या महानगरपालिकेची मंजुरी मागितल्यानंतर सार्वजनिक उद्दिष्टांकरिता आरक्षित असलेल्या जमिनी ताब्यात घेतल्या जातात. |
| ब. | विकास हक्क हस्तांतरणाच्या मोबदल्यात जमिन संपादन करणे | नाही. | सार्वजनिक उद्दिष्टांकरिता आरक्षित असलेल्या जमिनी मनपा आयुक्तांची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर ताब्यात घेतल्या जातात. |
| क. | मंजूर विकास आराखडा प्रस्तावांच्या अमंलबजावणीशी संबंधित महत्वाचे धोरण विषय | नाही. | खात्याची विविध धोरणे व प्रस्ताव निवडून आलेलया प्रतिनिधींचा समावेश असलेलया सुधार समिती / महानगरपालिकेला मंजुरीकरिता सादर केली जातात. सुधार समिती/ महानगरपालिकेच्या सभा वार्ताहरांकरिता खुल्या असतात व सुधार समितीच्या / महानगरपालिकेच्या महत्वाच्या निर्णयांना प्रसार माध्यमाव्दारे व्यापक प्रसिध्दी मिळते. |